# <u>*वार्तापत्र*</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांकः- २८/०१/२०१८

दिनांक २६ जानेवारी २०१८ रोजी गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री मा. अंम्ब्रीशराजे आत्राम यांच्या हस्ते पोलीस मुख्यालय गडचिरोली येथील मुख्य मैदानावर पार पडलेल्या ध्वजारोहण सोहळयास गडचिरोली पोलीस दलातर्फे आयोजीत करण्यात आलेल्या रेला नृत्य स्पर्धेतील विजेता संघ महेंद्र आलामी ग्रृप एटापल्ली आणि सरस्वती विद्यालय पोलीस संकुल गडचिरोली येथील चिमुरडयांनी आपले कलागुण सादर करत वेगळीच रंगत आणली.

सरस्वती विद्यालय पोलीस संकुल गडचिरोली येथील विद्यार्थ्यांनी वर्षाऋतुच्या आगमनासाठी आळवणी गीत म्हणून लगान चित्रपटातील 'घननघनन' या गीतावर नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली तर 'माझा महाराष्ट्र थोर संत महात्म्यांचा महाराष्ट्र' या संकल्पनेतून १८ विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विविध महात्म्यांच्या वेशभुषा, सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. यामध्ये संत ज्ञानेश्वराची भुमिका- कुमारी ईरा देशमुख, संत तुकाराम- टुपेश कटरे, संत गजानज महाराज- सुजल नेहारे, संत साईबाबा- लक्ष श्रिपदवार, संत गाडगे महाराज- श्रेयस कोडेकर, संत स्वामी समर्थ- एकलव्य मडावी, संत मिराबाई- गुंजन
ाटील, तसेच समाजसुधारक यांच्या वेशभुषात राजश्री शाहु महाराज- ओम भांड, लोकमान्य टिळक- यथार्थ नैताम, छ. शिवाजी महाराज- आदित्य डाखोरे, मा. ज्योतीबा फुले- दुर्विण अंकम, बिरसा मुंडा- अदवित नवडी, सावित्रीबाई फुले- अनन्या भुरकुरे, मातोश्री जिजाबाई- मोनिका आत्राम, भारतमाता- हेमाक्षी बच्चलवार, महात्मा गांधीजी- श्रेयश पुराम, पंडीत नेहरु- अनुष सिरगिरे, डॉ. सुभाषचंद्र बोस- समर कावळे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून या महापुरुषांच्या स्मृती उपस्थितांच्या मनात जाग्या करत महाराष्ट्राच्या वैभवी संत पंरपरेकडे सर्वांचे लक्ष वेधले.

यावेळी मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख सा़ो. यांच्या संकल्पनेतून गडचिरोली जिल्हयाच्या इतिहासात पहिल्यांदाच पोलीस मुख्यालय गडचिरोली येथील ध्वजारोहण सोहळयात पारंपारिक कला सादर करण्याचा मान महेंद्र आलामी ग्रृप एटापल्ली च्या संघाला मिळाला त्यांनी दिमाखदार पारंपारिक आदिवासी नृत्य सादर करुन आदिवासी संस्कृतीचे दर्शन उपस्थितांना घडविले.





महाराष्ट्र माझा... महाराष्ट्र माझा...
थोर संत महात्म्यांचा महाराष्ट्र माझा
RASWATI VIDYALAYA
Activity Based Education
Playing Atmosphere
English Medium
Economical Fees Structure
Fees Concession for
Nursery
KG-I, II